नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. २९ मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### टीईटीसाठी माध्यमनिहाय परीक्षा केंद्रांची निश्चिती

पुणे (स. गांवकरी) : राज्य परीक्षा परिषदेतर्फे रविवारी (२८ जून) महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) आयोजित करण्यात आली आहे. बंगाली, कन्नड, तेलगू, गुजराथी आणि सिंधी माध्यमातून परीक्षा देणाऱ्या उमेदवारांची संख्या राज्यात कमी असल्याने संबंधित उमेदवारांसाठी विशिष्ट जिल्ह्यांमध्ये परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आली आहेत. परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चोथे यांनी या बाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. टीईटी परीक्षा विविध भाषा माध्यमातून देण्याचा पर्याय उमेदवारांना उपलब्ध असतो. त्यानुसार उमेदवार त्यांच्या पसंतीच्या माध्यमाची निवड करतात. मात्र, मराठी, इंग्रजी माध्यमाच्या तुलनेत अन्य माध्यमातील उमेदवारांची संख्या कमी असल्याने या उमेदवारांसाठी माध्यमानुसार परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. यंदा परीक्षेसाठी उच्चांकी ६ लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

### अकरावी प्रवेशाची पहिली यादी शुक्रवारी

मुंबई (स. गांवकरी) : अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी शुक्रवारी जाहीर होत आहे. या पहिल्या फेरीसाठी २१ लाख ९८ हजार ६६६ जागा उपलब्ध असून, त्यासाठी ९ लाख ४ हजार विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग २ भरला आहे. त्यामुळे पहिल्या नियमित फेरीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यातील ९ हजार ५९१ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये एकूण २१ लाख ९८ हजार ६६६ जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी नियमित फेरीसाठी १७ लाख ४२ हजार ४२३ जागा आहेत. तर शून्य फेरीमध्ये कोटा प्रवेशातून ३९ हजार ६१३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याने सध्या २१ लाख ५९ हजार ५३ जागा रिक्त आहेत. अकरावी प्रवेशासाठी राज्यभरातून १२ लाख ४९ हजार ५१६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ९ लाख ४ हजार विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग २ भरला आहे.

### ३९५ पाणीयोजनांना निधीचा फटका

अहिल्यानगर (स. गांवकरी) : 'जलजीवन मिशन' कार्यक्रमातील पाणी योजना निधीअभावी रखडल्या असतानाच आता केंद्र सरकारने नूतनीकरण (रेट्रो) केलेल्या पाणीयोजनांना निधी मिळणार नाही, केवळ नवीन योजनांनाच निधी उपलब्ध होईल, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील नूतनीकरण केलेल्या ३९५ योजनांच्या कामांचा प्रश्न निर्माण झाला आहे. केवळ १६१ योजनांनाच निधी उपलब्ध होणार आहे. जलजीवन मिशन कार्यक्रमातील पाणी योजनांसाठी दोन दिवसांपूर्वी केंद्र व राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांची बैठक ग्रामीण पाणीपुरवठा व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांसमवेत दूरदृष्टी प्रणाली द्वारे झाली.

### पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत!

ठाणे (स. गांवकरी) : देशातील काही भागांमध्ये इंधन तुटवड्याच्या चर्चांना वेग आला असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता संयम राखण्याचे आवाहन केले होते. याच पार्श्वभूमीवर इंडियन ऑईलनेही महाराष्ट्रासह देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध असून इंधनपुरवठा पूर्णपणे सुरळीत सुरू असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. यामुळे नागरिकांनी इंधन तुटवड्याच्या अफवांवर विश्वास ठेऊ नका असे आवाहन देखील इंडियन ऑईलच्या वतीने करण्यात आले आहे.

# तुकाराम मुंढे 'ॲक्शन मोड' मध्ये

## तीन दिवसात ५३ धाडी अन् भेसळ करणारे ३३ जण तुरुंगात; विशेष मोहीम

मुंबई : (स. गांवकरी)

आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीसाठी प्रसिद्ध असलेले सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्त पदाचा कारभार हाती घेताच पुन्हा एकदा आपला इम्पॅक्ट दाखवून दिला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या तीन दिवसांतच मुंढे थेट 'ॲक्शन मोड' मध्ये आले असून त्यांनी राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाची एक विशेष धडक मोहीम सुरू केली आहे. राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अनधिकृत आणि बेकायदेशीर आस्थापनांना कडक इशारा देत प्रशासनाने मुंबई, पुणे आणि नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो रुपयांचा भेसळयुक्त साठा जप्त केला आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे नवे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी नुकताच 25 मे रोजी आपला नवीन कार्यभार स्वीकारला. पदभार हाती घेताच त्यांनी राज्यातील जनतेच्या आरोग्याला प्राधान्य देत सर्व विभागांतील अधिकाऱ्यांना तातडीने धाडी व जप्तीची विशेष मोहीम राबविण्याबाबत कडक निर्देश दिले होते.

आयुक्तांच्या या आदेशानंतर अन्न व औषध प्रशासनाच्या यंत्रणेने कमालीची तत्परता दाखवली. त्यानुसार बृहन्मुंबई,



कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या सर्वच विभागांमध्ये नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या भेसळखोरांवर, प्रतिबंधित गुटखा विक्रेत्यांवर, अस्वच्छ अन्न उत्पादकांवर आणि नियमभंग करणाऱ्या आस्थापनांविरोधात एकाच वेळी धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे.

तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी राज्यातील विविध संशयास्पद भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर छापे टाकले. यामध्ये प्रामुख्याने गुटखा, पानमसाला व तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या प्रकरणी एकूण 53 आस्थापनांची कसून तपासणी करण्यात आली. त्यापैकी 34 ठिकाणी बंदी असलेला गुटखा आणि पानमसाल्याची सर्रास विक्री होत असल्याचे रंगेहात आढळून आले. या प्रकरणी पोलिसांनी एकूण 25 एफआयआर दाखल केले असून गुन्ह्यात सामील असलेल्या 33 व्यक्तींना अटक केली आहे. तसेच गुटखा वाहतूक करणारी 5 वाहने जप्त करून 27 आस्थापनांना थेट सील ठोकण्यात आले आहे.

या धडक मोहिमेदरम्यान एकूण 20,57,296 रुपयांचा बेकायदेशीर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यापैकी सर्वात मोठी आणि मोठी कारवाई बृहन्मुंबई विभागात पाहायला मिळाली. मुंबई विभागात एकूण 19 आस्थापनांची झाडाझडती घेण्यात आली असून या सर्व 19 आस्थापनांना तातडीने सील करण्यात आले आहे. तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या 19 व्यक्तींविरुद्ध एफआयआर दाखल करून त्यांना पोलिसांनी अटक केली आहे. प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू आणि दिशाभूल करणारे पॅकिंग यावर प्रशासनाने हा मोठा प्रहार केला आहे.

गुटखा आणि पानमसाल्याव्यतिरिक्त, अन्न व औषध प्रशासनाच्या विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी आणखी 23 मोठ्या आस्थापनांची तपासणी केली. यामध्ये नागरिकांच्या दैनंदिन खाण्यापिण्याशी संबंधित असलेल्या पॅकबंद पिण्याचे पाणी, दूध, नुडल्स, कार्बोनेटेड वॉटर, खाद्यतेल, स्वीट व फरसाण, आईसक्रीम, ताडी, डिंक, मसाले, खवा, पनीर, तूप, बेसन व बेकरी पदार्थांच्या शुद्धतेची तपासणी करण्यात आली.

या कारवाईत सुमारे 28 लाख 78 हजार 572 रुपये किमतीचा संशयास्पद आणि नियमबाह्य अन्नपदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. हे सर्व अन्नपदार्थ असुरक्षित उत्पादन प्रक्रियेद्वारे तयार केले जात होते. जप्त केलेल्या सर्व अन्नाचे नमुने पुढील विश्लेषणासाठी आणि प्रयोगशाळेच्या चाचणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

# अभिनेते रितेश देशमुख यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार

मुंबई : (स. गांवकरी)



मनोरंजन, क्रीडा, सामाजिक कार्य, प्रशासन, उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करणारा 'झी २४ तास' वृत्तवाहिनीचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार वितरण सोहळा नुकताच यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पार पडला. महाराष्ट्र गौरव पुरस्काराच्या यंदाच्या दुसऱ्या पर्वात अभिनेते रितेश देशमुख यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी 'झी २४ तास'चे संपादक कमलेश सुतार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची खास मुलाखत घेतली. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, एस्सेल/झी समूहाचे अध्यक्ष आणि मार्गदर्शक डॉ. सुभाष चंद्रा, महाराष्ट्र शासनाचे आमदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रसाद लाड, मुंबई भाजप अध्यक्ष आणि आमदार अमित साटम, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, तसेच पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू आणि कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते. 'महाराष्ट्र हे नेहमीच विविध क्षेत्रांतील असामान्य प्रतिभा, नवकल्पना आणि नेतृत्वाचे केंद्र राहिले आहे. 'महाराष्ट्र गौरव पुरस्कारां'सारखे उपक्रम समाजावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या आणि राज्याच्या प्रगतीला बळकटी देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात', अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पुरस्कार सोहळ्याचे कौतुक केले. तर अशा पुरस्कारांमुळे विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्यांना उत्कृष्टतेसाठी प्रेरणा मिळते आणि पुढील पिढ्यांनाही प्रेरित करण्याचे काम होते, अशी भावना रितेश देशमुख यांनी पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केली. यंदाच्या पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री गिरिजा ओक- गोडबोले, अभिनेते सचिन कुमावत आणि कंटेट क्रिएटर सिद्धेश लोकरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव करण्यात आला. तसेच, अभिनेत्री आणि नृत्यांगना शर्वरी जमेनीस, अभिनेत्री हेमल इंगळे, अभिनेते अभिजित खांडेकर आणि अभिनेता पुष्कर जोग यांनी कार्यक्रम सादर करत सोहळ्याची रंगत वाढवली.

# मुख्यमंत्र्यांवर टीका करून जरांगे स्वतःचा जनाधार कमी करत आहेत

राहाता : (स. गांवकरी)

मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक आहेत. मुख्यमंत्र्यांवर टीका करून मनोज जरांगे आपला स्वतःचा जनाधार कमी करत आहेत, असा पलटवार मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केला आहे. मराठा समाजाच्या मागण्यांवर सरकारकडून सकारात्मक कार्यवाही सुरू आहे. उद्या, शुक्रवारी जरांगे पाटलांची भेट घेऊन त्यांना उपोषण स्थगित करण्याची विनंती करणार असल्याचे मंत्री विखे यांनी सांगितले. लोणी येथे आज, गुरूवारी माध्यमांशी बोलताना विखे म्हणाले, मुख्यमंत्री मागण्यांवर अतिशय सकारात्मक असताना फक्त त्यांनाच केंद्रबिंदू करून श वैयक्तिक टीका करणे योग्य नाही. एका व्यक्तीवर टीका करून प्रश्न सुटणार नाही. जरांगे पाटलांच्या लढ्याबद्दल आदरच आहे.



परंतु, मुख्यमंत्र्यांवर टीका करून ते आपला स्वतःचा जनाधार कमी करत आहेत. मराठा समाजाला यापूर्वी दिलेल्या आरक्षणाचे सर्व श्रेय देवेंद्र फडणवीस यांचेच आहे. त्यामुळे जरांगे पाटलांचे जे काही गैरसमज झाले आहेत, ते प्रत्यक्ष भेटीत दूर करणार असल्याचे विखे यांनी स्पष्ट केले. सन २०१४ ते २०१९ या काळात फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठा समाजाला दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले होते. समाजाच्या भावना लक्षात घेऊन सरकारने कार्यवाही केली, परंतु मधल्या काळात दुर्दैवाने महाविकास आघाडी सरकारला आरक्षण टिकवता आले नाही.

# छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयात पाहण्याकरिता खुली

मुंबई : (स. गांवकरी)

लंडन येथील व्हिक्टोरिया ॲण्ड अल्बर्ट संग्रहालयातून महाराष्ट्रात तीन वर्षांच्या करारावर आणण्यात आलेली वाघनखे लवकरच मुंबईकरांना पाहता येणार आहेत. नोव्हेंबरपासून छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयात ती प्रदर्शनासाठी ठेवली जातील. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि शिवराज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्षे झाल्याच्या निमित्ताने लंडन येथून तीन वर्षांच्या करारावर ही वाघनखे जुलै, २०२४मध्ये महाराष्ट्रात आणण्यात आली होती. राज्यात ठिकठिकाणच्या संग्रहालयांमध्ये ती प्रदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत. लंडनमधील संग्रहालयाशी झालेल्या करारानुसार संबंधित संग्रहालयांचे अभिरक्षक आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे संचालक यांच्यावर वाघनखांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. हा ऐतिहासिक ठेवा जपण्याकरिता विशेषत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना काळजी घेण्यात



येत आहे. आतापर्यंत नागपूर, सातारा येथे ती प्रदर्शनासाठी ठेवण्यात आली होती. सध्या कोल्हापूरच्या लक्ष्मी विलास पॅलेसमध्ये वाघनखे प्रदर्शनासाठी ठेवण्यात आली आहेत. तेथून ती नोव्हेंबरमध्ये मुंबईत आणली जातील. त्याकरिता २० लाख रूपये खर्च येणार असून प्रदर्शनाकरिता छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात ठेवली जातील. अफझलखानाचा वध करण्याकरिता छत्रपती शिवाजी महाराजांनी या वाघनखांचा वापर केला होता, असा राज्य सरकारचा दावा आहे. तर इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांनी माहिती अधिकार आणि पत्रव्यवहाराद्वारे लंडनच्या संग्रहालयाकडून वाघनखांबाबत माहिती मिळविली होती.

त्यात ही वाघनखे महाराजांची आहेत, याचा ऐतिहासिक पुरावा आमच्याकडे नाही, असे संग्रहालयाने स्पष्ट केले होते. काही इतिहासकारांच्या मते, ब्रिटीशांनी साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह यांचे वंशज किंवा इतर मराठा सरदारांकडून गोळा केलेल्या वस्तू लंडनमधील संग्रहालयात ठेवण्यात आल्या आहेत. तर काहींच्या मते खरी वाघनखे साताऱ्याच्या संग्रहालयातच असावी. माजी खासदार आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती संभाजीराजे यांनी ती भाडेतत्त्वावर आणण्याऐवजी महाराष्ट्रात कायमस्वरूपी आणण्याची मागणी केली होती.

# बकरी ईद : मीरा रोडच्या सोसायटीत भीतीचे वातावरण

## रहिवासी म्हणाले, 'आमची प्रतिमा डागाळली'

मुंबई : (स. गांवकरी)

बकरी ईदच्या निमित्ताने मीरा रोडमधील उच्चभ्रू सोसायटी असलेले पूनम इस्टेट क्लस्टर १ हे गृहसंकूल चर्चेत आले. बकरी ईदच्या आधी सोसायटीच्या आवारात बकरे आणल्यानंतर वाद उद्भवला होता. यानंतर काही स्थानिक हिंदुत्ववादी संघटनांनी सोसायटीत शिरून बकरे सोडण्याचा प्रयत्न केला. यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. त्यातच आंदोलकांनी डुक्कर आणून त्याची कत्तल करणार असल्याचे जाहीर केले होते. यामुळे परिस्थिती आणखीनच चिघळली. या सर्व प्रकारानंतर पूनम क्लस्टरमधील रहिवासी भयभीत झाले असून त्यांना धक्का बसला आहे. याबद्दल द इंडियन एक्सप्रेसशी संवाद साधत आपल्या भावना व्यक्त केल्या. सोमवारी (२५ मे) रात्री आणि मंगळवारी गृहसंकुलाबाहेर जातीय तणाव निर्माण झाला होता. मंगळवारपासून गृहसंकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ मोठ्या प्रमाणात पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. सोसायटीमधील रहिवाशांनी सांगितले की, सोसायटीमध्ये सर्वधर्मीय, सर्व समाजाचे लोक राहत असून आजवर त्यांच्यात कधीही तंटा झाला नाही. बकरी ईदनिमित्त उद्भवलेल्या संघर्षात गृहसंकुलातील कोणताही सदस्य सामील नव्हता. एका रहिवाशाने सांगितले की, सोसायटीबाहेर कडक बंदोबस्त असल्यामुळे तो इतका घाबरला होता की, तो घरातच थांबून राहिला. तसेच तणाव वाढल्यानंतर बाहेरच्या लोकांना सोसायटीत प्रवेश नाकारल्यबद्दल त्याने पोलिसांचे कौतुकही केले. बकरी ईदनिमित्त सोसायटीच्या मोकळ्या जागेत बकऱ्या बांधल्यानंतर डी विंगमधील काही रहिवाशांनी त्याची तक्रार दाखल केली होती, त्यातून हा प्रकार घडला. रहिवाशांनी आरोप केला आहे की, जवळपास आठ वर्षांपासून सोसायटीच्या मोकळ्या जागेत शेड बांधून तिथे बकऱ्या ठेवल्या जातात. या शेडमधून दुर्गंधी, शेळ्यांचा आवाज आणि अस्वच्छता निर्माण होत आहे. याबद्दल रहिवाशांनी वेळोवेळी आवाजही उचलला होता. एका रहिवाशाने म्हटले की, शेडमधून दिवसभर उग्र वास येत




होता. याशिवाय शेळ्यांचा आणि त्यांना सांभाळणाऱ्यांचा गोंगाटही सुरू होता.

रहिवाशांनी सांगितल्यानुसार, त्यांनी काशिमिरा पोलिसांशी संपर्क साधून या प्रकाराची तक्रार दिली होती. मात्र पोलिसांनी हे प्रकरण महानगरपालिकेच्या अखत्यारित येत असल्याचे म्हटले. यानंतर काही रहिवाशांनी विश्व हिंदू परिषदेच्या स्थानिक कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. त्यानंतर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सोसायटीला भेट दिली आणि अग्निसुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यानंतर तात्पुरते शेड पाडले. काही रहिवाशांनी झाल्या प्रकाराबद्दल यंत्रणेलाही दोष दिला. "पोलीस किंवा महानगरपालिकेने स्पष्ट असे आदेश दिले नाहीत. रहिवासी गृहसंकुलात शेळ्या आणणे नियमबाह्य आहे, हे स्पष्टपणे सांगितले गेले असते तर लोकांनी सोसायटीमध्ये शेळया आणल्या नसत्या, असे एका रहिवाशाने सांगितले. डी विंगमधील रहिवासी हेमनश्री जोशी यांनी सांगितले की, सोमवारी रात्री मुस्लीम समाजाचे तीन आणि सोसायटीच्या कमिटीमधील एक अशा चार लोकांनी तिच्या घरी भेट देऊन स्वच्छतेचे सर्व नियम पाळले जातील, असे आश्वासन दिले. शेड बांधलेली जागा दिवसातून तीन वेळा स्वच्छ केली जाईल आणि कोणताही गोंधळ केला जाणार नाही. त्यामुळे हा प्रश्न बऱ्यापैकी सुटला होता.

# पेट्रोल, डिझेलवरील व्हॅट, उपकर रद्द करावा : जयंत पाटील



मुंबई : (स. गांवकरी)

पेट्रोल, डिझेलची सतत दरवाढ होत आहे. सलग दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. नागरिकांना तातडीने दिलासा देण्याची गरज आहे. त्यामुळे राज्य सरकारने पेट्रोल – डिझेलवरील व्हॅट व सरचार्ज तत्काळ रद्द करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. आखाती युद्धामुळे महाराष्ट्रासह देशाच्या आर्थिक परिस्थितीवर प्रचंड ताण येत आहे. महागाई प्रचंड वाढली आहे. खाद्य तेल, भाजीपाला, जीवनावश्यक वस्तूंच्या दरात मोठी वाढ झाली आहे. त्याचा फटका थेट सामान्य माणसाला बसत आहे. पेट्रोल डिझेलच्या सततच्या दरवाढीमुळे त्यात भरच पडत आहे. मागील दहा दिवसांत सलग चौथ्यांदा ही वाढ केली जात आहे. आजघडीला मुंबईत १११.१२ रुपये प्रति लिटर पेट्रोल, तर डिझेल ९६.८६ रुपये प्रति लिटरवर गेले आहे. या महागाईतून सामान्य जनतेला दिलासा देण्याची गरज असल्याचे पाटील यांनी पत्रात म्हटले आहे.

राज्य सरकार इंधनावर व्हॅट आणि सरचार्ज आकारते जे मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईसह संपूर्ण राज्यात लागू आहे. राज्यात पेट्रोलवर अंदाजे २५ टक्के व्हॅट आणि १०.१२ रुपये प्रति लिटर सरचार्ज लावला जातो.

डिझेलवर अंदाजे २४ टक्के व्हॅट आणि ३.०० रुपये प्रति लिटर सरचार्ज लावला जातो. राज्य शासनाने पेट्रोल – डिझेलवरील व्हॅट व सरचार्ज रद्द करून टाकावा. त्यामुळे आज १११ रुपयांना मिळणारे पेट्रोल व डिझेल थेट ७० – ८० रुपयात मिळू शकते, असे झाल्यास या कठीण काळात नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो, असेही जयंत पाटील यांनी पत्रात म्हटले आहे.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी



# पारनेर शहरातील महामार्गाच्या कामाला गती द्या

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची पालकमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

पारनेर : (स. गांवकरी)




पारनेर शहरातून जात असलेल्या महामार्गाचे काम संथ गतीने सुरू असून, त्यामुळे नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित विभागाने रस्त्याच्या कामाला गती देऊन पुढील दोन महिन्यांच्या आत हे काम पूर्ण करावे, अशी मागणी करणारे लेखी निवेदन पारनेर तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आरपीआय) युवक तालुकाध्यक्ष प्रदीप संपतराव नगरे यांनी राज्याचे महसूल व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिले आहे.पालकमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात प्रदीप नगरे यांनी पारनेर शहरातील वाहतूक आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. पारनेर शहरातील ग्रामीण रुग्णालय, सुपा रोड आणि पानोली चौक या दरम्यानच्या महामार्गाचे काम अद्याप सुरू करण्यात आलेले नाही. पारनेर बस स्थानकापासून शाळा आणि महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची याच मार्गावरून नेहमी वर्दळ असते. शाळा-कॉलेज भरताना आणि सुटताना या परिसरात प्रचंड गर्दी होत असते. जर शाळा सुरू असताना हे काम रेंगाळत राहिले, तर या भागात वाहतूक कोंडी होऊन अपघातांची मोठी शक्यता निर्माण होऊ शकते, अशी भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.सध्या शाळा व महाविद्यालयांना उन्हाळी सुट्ट्या आहेत. त्यामुळे रस्त्यावर विद्यार्थ्यांची वर्दळ कमी आहे. हीच योग्य वेळ साधून ग्रामीण रुग्णालय, सुपा रोड आणि पानोली चौक या भागातील रस्त्याच्या कामाला युद्धपातळीवर गती द्यावी. पुढील दोन महिन्यांच्या आत हे काम पूर्ण करण्यासंदर्भात आपल्या स्तरावरून सार्वजनिक बांधकाम विभागाला योग्य ते आदेश पारित करावेत, अशी आग्रही मागणी 'आरपीआय'च्या वतीने करण्यात आली आहे.

देवीभोयरे फाटा, पारनेर, हंगा, सुपा, वाळवणे, खडकी या रस्त्याचे काम 'हुडको'च्या आर्थिक सहाय्यातून सध्या प्रगतीपथावर आहे. याच कामाचा भाग असलेल्या पारनेर शहरातील ग्रामीण रुग्णालय, सुपा रोड आणि पानोली चौक या परिसरातील कामाला लवकरात लवकर गती देऊन ते पूर्ण करण्यात यावे, अशा स्पष्ट सूचना संबंधित ठेकेदाराला देण्यात आलेल्या आहेत, अशी माहिती अहिल्यानगर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी दिली आहे.

# 'बाधा' घालवण्याच्या बहाण्याने ६.५ लाखांची फसवणूक

## महिलेवर तांत्रिकाकडून लैंगिक अत्याचार


पारनेर : (स. गांवकरी)




मतिमंद मुलाचा आजार बरा करण्याचे आणि भावाचे लग्न जमवून देण्याचे आमिष दाखवून एका कुटुंबाची साडेसहा लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पारनेरमध्ये उघडकीस आला आहे. एवढेच नव्हे तर, मुलाला जिवंत मारण्याची धमकी देऊन भोंदूबाबाने पीडित महिलेवर वारंवार जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याची चटका लावणारी घटना समोर आली आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात मुख्य भोंदू बाबा, त्याचा मुलगा आणि महिला साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पठारे मळा, पारनेर येथील रहिवासी असलेल्या ४० वर्षीय पीडित शेतकरी महिलेचा १७ वर्षांचा मुलगा अनिकेत हा मतिमंद आहे. वैद्यकीय उपचार करूनही त्याच्यात सुधारणा होत नव्हती, तसेच शेतीत पिके येऊनही घरातील कर्ज फिटत नव्हते. याच दरम्यान पीडितेचा भाऊ बाळासाहेब रेपाळे याचेही वय होऊनही लग्न जमत नव्हते. कौटुंबिक अडचणींनी खचलेल्या या महिलेला रुई छत्रपती (ता. पारनेर) येथील राजू बन्सी दिवटे, त्याचा मुलगा शशिकांत राजू दिवटे आणि त्यांची महिला सहकारी शोभा अविनाश तरटे (रा. म्हसणे, पारनेर) हे देवऋषी (देवभगत) असून ते अडचणींवर तोडगा काढतात, अशी माहिती मिळाली होती. पीडितेने २०२० मधील कोरोना काळापासून या भोंदूबानांकडे जाण्यास सुरुवात केली. त्यावेळी संशयित भोंदूबाने, "तुमच्या कुटुंबाला मांढरदेवीच्या काळुबाईची बाधा आहे, त्यासाठी होमहवन व पूजा करावी लागेल," असे सांगितले. मुलाच्या उपचारासाठी ३ ते ४ लाख आणि भावाच्या लग्नासाठी दीड लाख रुपये खर्च येईल, असे सांगून त्यांनी पीडितेकडून मुलाचे व भावाचे फोटो तंत्र-मंत्र करण्यासाठी मागवून घेतले.सुरुवातीला पूजा साहित्याच्या नावाखाली शोभा तरटे हिने १० हजार रुपये घेतले. त्यानंतर पारनेर येथील मुख्य बाजारपेठेतील चौधरी कॉम्प्लेक्समधील घरात काळुबाईच्या फोटोसमोर होमहवन करून पीडितेला अंगारा व तीर्थ पिण्यास दिले. जानेवारी २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान पीडितेने गायत्री कॉम्प्युटर्स, पारनेर यांच्यामार्फत २ लाख ५६ हजार ६८४ रुपये ऑनलाईन आणि एप्रिल २०२६ मध्ये २ लाख रुपये रोख, असे एकूण ४ लाख ५६ हजार रुपयांहून अधिक रक्कम राजू दिवटे याला दिली. तसेच भावाच्या विवाहासाठी एकूण १ लाख ९३ हजार ५३० रुपये ऑनलाईन व रोख स्वरूपात उकळले. ही सर्व रक्कम पीडितेने 'येस बँक फायनान्स'कडून कर्ज काढून दिली होती.पैसे उकळल्यानंतरही मुलाच्या तब्येतीत फरक पडला नाही. यादरम्यान आरोपी राजू दिवटे हा पीडितेला मांढरदेव येथे पूजेसाठी चारचाकी गाडीतून नेत असताना त्याने गाडीत अश्लील वर्तन केले. त्यानंतर चौधरी कॉम्प्लेक्समधील फ्लॅटवर "मुलाच्या उत्तम आयुष्यासाठी माझ्यासोबत शरीरसंबंध ठेवावे लागतील, नाहीतर तुझ्या मुलाच्या फोटोचे तुकडे करून काळुबाईच्या कोपाने त्याला मारून टाकीन," अशी धमकी दिली. मुलाच्या जिवाच्या भीतीने पीडितेने होकार दिला. संशयित राजू दिवटे याने पीडितेला गुंगीचे किंवा रंगीत पाणी पाजून जानेवारी २०२५ ते १ मार्च २०२६ दरम्यान तब्बल ८ ते १० वेळा तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला.काहीही फरक न पडल्याने जेव्हा पीडितेने आणि तिच्या भावाने आपले पैसे परत मागितले, तेव्हा आरोपींनी दोघांनाही शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. "कुठेही तक्रार केली तर समाजात बदनाम करीन, सासरी नांदू देणार नाही," अशी धमकी पीडितेला दिली, तर भावाला "एका रात्रीत तडफडून मारून टाकीन" अशी तांत्रिक धमकी दिली. भीतीच्या छायेत असलेल्या पीडितेने अखेर आपल्या सासू-सासऱ्यांना हा सर्व प्रकार सांगितला. त्यांनी धीर दिल्यानंतर पीडितेने पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यासह बलात्कार, फसवणूक आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# पारनेर तालुक्यात बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी

पारनेर : (स. गांवकरी)



देशभरात गुरुवारी (दि. २८) मुस्लिम बांधवांचा पवित्र सण 'बकरी ईद' (ईद-उल-अजहा) अत्यंत उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यातही सर्वत्र आनंदाचे आणि सलोख्याचे वातावरण पाहायला मिळाले. तालुक्याचे मुख्य केंद्र असलेल्या पारनेर शहरासह सुपा, निघोज, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, दरोडी, पिंपळगाव रोठा, भाळवणी यांसह ग्रामीण भागातील बहुतांश गावांमध्ये हा सण मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरा करण्यात आला. पारनेर शहरातील मुख्य ईदगाह मैदान येथे गुरुवारी सकाळी शहरातील सर्व मुस्लिम बांधव पारंपरिक पोशाखात एकत्र आले होते. यावेळी सर्वांनी सामूहिक नमाज पठण केले. नमाजनंतर देशात शांतता, समृद्धी आणि बंधुभाव टिकून राहावा यासाठी विशेष प्रार्थना (दुआ) करण्यात आली. नमाज संपन्न झाल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट घेऊन ईदच्या मनापासून शुभेच्छा दिल्या. यावेळी लहान थोरांचा उत्साह ओसंडून वाहत होता.या पवित्र सणाचे औचित्य साधून पारनेर येथील ईदगाह मैदानावर संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. आर. जी. सय्यद उपस्थित होते. त्यांनी उपस्थित सर्व मुस्लिम बांधवांना संबोधित करताना मोलाचे सामाजिक प्रबोधन केले "बकरी ईद हा सण त्याग, समर्पण आणि अमूल्य मानवी मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देतो. समाजात शांतता आणि एकोपा टिकवून ठेवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. संतांच्या भूमीत आपण राहतो, त्यामुळे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत आपण सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक सलोखा अधिक मजबूत केला पाहिजे," असे आवाहन डॉ. सय्यद यांनी केले.

# आदिवासी आधारविना; पोशेरा ग्रामपंचायतीवर आंदोलन

पालघर : (स. गांवकरी)

"देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे झाली, तरी आम्हा गरिबांना अजून एक आधार कार्डही मिळू नये?" असा संतप्त सवाल करत पोशेरा ग्रामपंचायतीवर श्रमजीवी संघटनेचा विराट मोर्चा धडकला. अंगाची लाहीलाही करणाऱ्या भीषण उन्हात, हातात संघटनेचे झेंडे घेऊन शेकडो आदिवासी कातकरी बांधव रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनात आपल्या पोटच्या लहान लेकरांना कडेवर घेऊन तासन्तास उन्हात उभे राहिलेल्या माता-भगिनींचे दृश्य प्रशासनाच्या डोळ्यात अंजन घालणारे होते. तब्बल ३ तास जबाबदार अधिकारी जागेवर नसल्याने आंदोलनकर्त्यांचा संताप अनावर झाला होता, मात्र अखेर प्रशासनाला नमते घ्यावेच लागले. या मोर्चादरम्यान आंदोलनकर्त्यांनी प्रशासनासमोर आधार कार्डसह, गावातील तीव्र पाणीटंचाई, 'जल जीवन मिशन' नळ योजनेची सद्यस्थिती, रोजगार हमीचे काम आणि गेल्या काही वर्षांतील विकासकामांचा




## प्रशासनाचे लेखी आश्वासन

हिशोब छायाचित्रांसह देण्याची मागणी लावून धरली. देशाच्या स्वातंत्र्याला अनेक वर्षे उलटूनही पोशेरा ग्रामपंचायत हद्दीतील शून्य ते सतरा वर्षांच्या आतील आणि अठरा वर्षांपेक्षा जास्त वय असणारे असे तब्बल दोनशे गरीब आदिवासी बांधव अजूनही आधार कार्डपासून वंचित असल्याचा गंभीर मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. प्रशासनाच्या ढिम्म कारभाराविरोधात आदिवासी बांधवांनी घेतलेला आक्रमक पवित्रा आणि आंदोलनाचा वाढता दबाव पाहून अखेर ग्रामसेवक मंगेश पाटील आणि स्थानिक सरपंचांनी नमती भूमिका घेतली. त्यांनी श्रमजीवी संघटनेच्या शिष्टमंडळाशी तातडीने सकारात्मक चर्चा करून, वंचित १४५ नागरिकांना लवकरात लवकर तातडीने आधार कार्ड मिळवून देण्याचे आणि गावातील भीषण पाणीटंचाईचा प्रश्न प्राधान्याने सोडवण्याचे लेखी आश्वासन दिले. प्रशासनाकडून लेखी पत्र मिळाल्यानंतरच हे आंदोलन शांत झाले. मात्र, दिलेल्या मुदतीत काम न झाल्यास याहून तीव्र संघर्ष छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. या मोर्चामध्ये श्रमजीवी संघटनेचे पालघर जिल्हा उपाध्यक्ष अंकुश वड, मोखाडा तालुका निरीक्षक रघुनाथ चौधरी, तालुका अध्यक्ष ईश्वर बांबरे, ता. सहसचिव रामदास वाघ, माजी तालुकाध्यक्ष पांडू मालक आणि संदीप पागारी प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच अनिल वाघ, विनोद वळवी, गोकुळा वळवी या सक्रिय कार्यकर्त्यांसह संघटनेचे शेकडो सभासद व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे

## अदमनकर यांना प्रज्ञा बहुदेशीय संस्थेचा समाजभूषण पुरस्कार जाहीर



बिलोली (स. गांवकरी) : प्रज्ञा बहुद्देशीय सेवा संस्थान व भास्कर व्यायाम शाळा व क्रिडा मंडळतर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय "समाजभूषण" पुरस्कार-२०२६ यंदा नांदेड जिल्ह्यातील बिलोली शहरातील रहिवासी सुदर्शन गंगाराम अदमनकर यांना जाहीर झाला आहे. समाजकार्य, माणुसकी व सेवाभाव करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी दिला जातो. सुदर्शन गंगाराम अदमनकर यांनी समाजकार्य व रक्तदान चळवळ या माध्यमातून गर्भवती महिला, थलसेमीया बाधित रुग्ण, सिकलसेल अनेमीया, अपघातग्रस्त रुग्ण व शरीरातील रक्ताची कामतरता असलेल्या हजारो रुग्णांना सढळ हाताने मोफत रक्त पुरवठा करण्यास मदत केली. त्यांच्या या सामाजिक योगदानाची दखल घेत प्रज्ञा बहुद्देशीय सेवा संस्थान व भास्कर व्यायाम शाळा व क्रिडा मंडळचे अध्यक्ष किरण सदावर्ते यांनी सुदर्शन अदमनकर यांची निवड करण्यात आली आहे असे त्यांना स्वतः भ्रमणध्वनीद्वारे कळविले. या पुरस्कारमुळे त्यांना अनेक मान्यवराकडून शुभेच्छा संदेश देण्यात आले. शुभेच्छा देणाऱ्यामध्ये मनसे जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंग जहागीरदार, मनसे शहराध्यक्ष अब्दुल शफिक, अर्पण रक्तकेंद्राचे संचालक कृष्णा भुसेवाड, अहमद उबेद, संतोष छलेवाड, संभाजी जाधव, संजय चव्हाण आदीसह अनेकांचा सहभाग होता.

## नांदेड विधानपरिषद निवडणूक : “माधव पर्व” सुरू होणार का ?



तामसा (स. गांवकरी) : नांदेड जिल्ह्यातील आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नावाची पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगरसेवकांच्या संभाव्य पाठिंब्यामुळे “माधव पर्व” पुन्हा सुरू होणार का, अशी चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. राजकीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील एकूण ३५४ संभाव्य नगरसेवकांपैकी तब्बल २०८ नगरसेवकांची जुळवाजुळव अशोकरावांच्या छत्रछायेखाली होत असल्याची जोरदार चर्चा आहे. या संभाव्य गणितामुळे विधानपरिषद निवडणुकीतील समीकरणे वेगाने बदलताना दिसत आहेत. सध्या उपलब्ध असलेल्या पक्षीय संख्याबळानुसार भाजपकडे ७७, काँग्रेसकडे ७५,राष्ट्रवादी (अप )71,शिवसेना (ठा.)17शिंदे गटाकडे १५, मराठवाडा जनहित पार्टीकडे ३३, एमआयएमकडे ५ वंचित बहुजन आघाडी 1 तर अपक्ष नगरसेवकांची संख्या १३ असल्याचे सांगितले जात आहे. या सर्वांमधील अनेक नगरसेवकांनी जर माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नावावर एकमत दर्शविले, तर विधानपरिषद रणांगणात त्यांची दमदार एन्ट्री निश्चित मानली जात आहे.

## एल-निनोच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाची जनजागृती मोहीम

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : यावर्षी एल-निनो या हवामान घटकाचा प्रभाव राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला असून, कमी पाऊस व पावसातील खंडामुळे दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी विशेष जनजागृती मोहीम सुरू केली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार जूनमध्ये सौम्य, जुलै-ऑगस्टमध्ये मध्यम तर सप्टेंबरमध्ये तीव्र स्वरूपाचा एल-निनो राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई न करता किमान 80 ते 100 मि.मी. पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. सहायक कृषी अधिकारी गावनिहाय पावसाचे प्रमाण व जमिनीतील ओलाव्याची पाहणी करून त्यानुसार पेरणीबाबत मार्गदर्शन करणार आहेत. दुबार पेरणी टाळण्यासाठी शेतकऱ्यांना योग्य वेळी सल्ला दिला जाणार आहे.

# ईद -उल - अजहा अर्थात बकरी ईद शांततेत साजरी

■ शांतता, बंधुता आणि सामाजिक सलोखा जपत हा सण साजरा करावा : धर्मगुरू मुफ्ती अली अजगर

राजगुरुनगर : (स. गांवकरी)



बकरी ईद हा मुस्लिम समाजातील पवित्र आणि त्यागाचा संदेश देणारा सण असून हा सण साजरा करताना प्रशासनाच्या नियमांचे पालन करून, कायद्याचे उल्लंघन न करता शांतता, बंधुता आणि सामाजिक सलोखा जपत हा सण साजरा करावा, असे आवाहन मशिदीचे धर्मगुरू मुफ्ती अली अजगर यांनी बकरी ईद निमित्ताने नागरिकांना केले.

राजगुरुनगर येथे बकरी ईद शांततापूर्ण वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी येथील दिलावर खान दर्गा मैदानावर शहर व परिसरातील मुस्लिम बांधव एकत्र येऊन सामुदायिक नमाज पठण केले. रमजान ईद नंतर या सणाला विशेष महत्व आहे.या सणाला कुर्बानी ची प्रथा आहे'.इस्लाम धर्माचे पैगंबर हजरत इब्राहीम अलैः यांचे पुत्र ह. इस्माईल यांच्या स्मुर्ती पिथीर्त बकरी ईद सणाद्वारे मुस्लीम बांधव या दिवशी उजाळा देतात यावेळी इस्लामीकालगणनेनुसार जिल हिज्जाच्या शेवटच्या १०तारखेस बकरी ईद सण साजरा केला जातो. त्या नुसार राजगुरुनगर येथे बकरी ईद शांतता पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी ईद निमित्ताने मार्गदर्शन करताना मशिदीचे धर्मगुरू मुफ्ती अली अजगर पुढे म्हणाले सण साजरा करताना इतरांना त्रास होणार नाही याची विशेष काळजी घ्या, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता होणार नाही याची दक्षता घेऊन प्रशासनाच्या नियमांचे पालन करणे तसेच शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राखणे आवश्यक असल्याचे सांगितले.

तसेच सोशल मीडियावर अफवा किंवा आक्षेपार्ह संदेश प्रसारित करू नयेत, पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करावा आणि सर्व धर्मीयांमध्ये बंधुभाव वाढेल असे वर्तन ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सण शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी अध्यक्ष समीर मोमीन, नौशाद तांबोळी, सादिक मोमीन, मोहसिन आतार, अकील शेख, इकबाल मोमीन आदींनी यावेळी विशेष दक्षता घेतली. तसेच खेड पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे सहकार्य लाभले.

# रावेर तहसील ईदगाहांमध्ये बकरीदची नमाज अदा

रावेर : (स. गांवकरी)

ईद-उल-अजहा (बकरीद) निमित्त, रावेर तहसीलच्या गावांमधील आणि शहरांमधील भक्तिभावाने बकरीदची नमाज अदा करण्यात आली. नमाजानंतर देशात शांतता आणि समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली. आज रावेर ईदगाहवर सकाळी ८.०० वाजता नमाज अदा करण्यात आली. रावेर पोलीस निरीक्षक विशाल जयस्वाल यांनी ईदगाहवर दाखल होऊन लोकांना बकरीदच्या शुभेच्छा दिल्या आणि सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.गुरुवारी रावेरमध्ये ईद-उल-अजहा (बकरीद) चा सण भक्तिभाव, पवित्रता आणि बंधुभावाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शहरी आणि ग्रामीण मध्य मशिदी आनी ईदगाहांमध्ये लोकांनी देश, राज्य आणि तहसीलमध्ये शांतता व समृद्धीसाठी प्रार्थना करत भक्तिभावाने नमाज अदा केली. नमाजानंतर लोकांनी एकमेकांना आलिंगन देऊन, ईद मुबारकच्या शुभेच्छा दिल्या. रावेर येथील ईदगाहमध्ये सकाळी ७:३० वाजता ईदची नमाज अदा करण्यात आली. जामा मशिदीचे इमाम शोएब यांनी नमाजाचे पठण केले. नमाजानंतरच्या आपल्या भाषणात ते म्हणाले की, बलिदान , त्याग, भक्ती , आणि मानवतेचा संदेश दिला. ते म्हणाले की, ईद-उल-अझहाचा खरा आत्मा म्हणजे अल्लाहच्या मार्गात आपल्या सर्वात प्रिय वस्तूंचा त्याग करण्याचा संदेश देणे होय. याप्रसंगी, रावेर पोलीस अधिकाऱ्यांनी प्रशासनासह ईदगाहला भेट दिली आणि मुस्लिम बांधवांना ईद मुबारकच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. आरसीपीची एक तुकडीही उपस्थित होती. डॉ. विशाल जैस्वाल म्हणाले की, बकरीदचा सण त्याग, भक्ती आणि परस्पर बंधुत्वाचा संदेश देतो.

# मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक

## ग्रामपंचायतींनी कचरा वर्गीकरण, घराघरांतून संकलन व स्थानिक स्तरावरील प्रक्रियेवर भर देण्याचे आवाहन

ठाणे : (स. गांवकरी)

केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयांतर्गत पेयजल व स्वच्छता विभागामार्फत ग्रामीण भागासाठी लागू करण्यात आलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हास्तरीय आढावा बैठक घेतली. १ एप्रिल, २०२६ पासून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम कायदेशीररित्या बंधनकारक करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. गावातील ओला व सुका कचरा स्थानिक स्तरावर वैज्ञानिक पद्धतीने व्यवस्थापित करून “कचरामुक्त गाव” ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दिली. तसेच ग्रामपंचायतींनी प्रत्येक गावासाठी स्वतंत्र “कचरा व्यवस्थापन कृती आराखडा” तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश दिले. गावातील घरांमधून, दुकाने व संस्थांकडून वर्गीकृत कचरा संकलित करण्यासाठी घंटागाड्यांची व्यवस्था करणे, तसेच स्थानिक पातळीवर कंपोस्ट खत, वर्मी कंपोस्टिंग व बायोगॅस प्रकल्प उभारणीस प्राधान्य देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड, सर्व गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग तसेच संबंधित विभागांचे अधिकारी- कर्मचारी सहभागी झाले होते. बैठकीत घराघरांतून कचरा चार प्रकारांमध्ये वर्गीकृत करून देणे बंधनकारक असल्याबाबत जनजागृती करण्यावर विशेष भर देण्यात आला. उघड्यावर, सार्वजनिक ठिकाणी, नाल्यांमध्ये किंवा ओढ्यांमध्ये कचरा टाकणे, जाळणे किंवा पुरणे हा दंडनीय गुन्हा असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. तसेच लग्न, यात्रा, जत्रा किंवा मोठ्या कार्यक्रमांच्या आयोजकांनी तीन दिवस अगोदर ग्रामपंचायतीला माहिती देऊन कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडावी, अशा सूचनाही देण्यात आल्या. ग्रामीण भागात घराघरांतून कचरा संकलन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन युनिट उभारणी, जुन्या कचरा डेपोचे निर्मूलन तसेच बल्क वेस्ट जनरेटर्सची नोंदणी यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. ग्रामपंचायतींनी ग्रामविकास आराखड्यात घनकचरा व्यवस्थापनाचा समावेश करून आवश्यक निधी नियोजन करावे, असेही निर्देश देण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतींनी दरवर्षी ३० जूनपूर्वी मागील वर्षाचा कचरा व्यवस्थापन अहवाल (Form-IV) ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य असल्याचे सांगण्यात आले. तालुकास्तरावर नागरिकांच्या तक्रार निवारणासाठी ऑनलाइन व ऑफलाइन यंत्रणा सक्रिय ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

तसेच गावातील अनौपचारिक कचरा वेचकांची अधिकृत नोंदणी करून त्यांना व्यवस्थेमध्ये समाविष्ट करण्याचे निर्देश देण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी ओल्या कचऱ्यासाठी हिरव्या व सुका कचऱ्यासाठी निळ्या रंगाच्या कचराकुंड्या उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा करण्यात आली. सरपंच, सदस्य आणि ग्रामस्थांमध्ये नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ग्रामसभा, मासिक सभा, महिला सभा घेण्याच्या सुचना तसेच बॅनर व पोस्टर लावणे, घंटागाडीद्वारे गाण्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याच्या सुचना देण्यात आल्या. बैठकीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सर्व ग्रामपंचायतींनी नियमांचे काटेकोर पालन करून स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक गाव निर्मितीसाठी लोकसहभाग वाढवावा, असे आवाहन केले. “घनकचरा व्यवस्थापन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून ती लोकसहभागातून यशस्वी होणारी चळवळ आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने कचरा वर्गीकरण, स्थानिक स्तरावर प्रक्रिया आणि स्वच्छता व्यवस्थापनावर प्रभावीपणे काम करणे आवश्यक आहे. ‘कचरामुक्त व स्वच्छ गाव’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे प्रशासन सर्व ग्रामपंचायतींसोबत समन्वयाने कार्य करत आहे,” असे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले.

# शैक्षणिक, क्रीडा व सुरक्षा क्षेत्रातील बहु आयामी व्यक्तिमत्त्व

## श्री बाबासाहेब किसनराव वैद्य

(स. गांवकरी)

**अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे हभप सावित्रीआई माध्यमिक विद्यालय,विठे या विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक मा.बाबासाहेब किसनराव वैद्य हे शिक्षण सारख्या पवित्र क्षेत्रात सन १९९२ ते २०२६ अशी तब्बल ३४ वर्षे सेवा करून दि.३१ मे रोजी मुख्याध्यापक पदावर सेवानिवृत्त होत आहे. त्यांचा आज सेवापूर्ती सोहळा संपन्न होताना त्यांच्या जीवनपटावर टाकलेला प्रकाश झोत...**



■ शब्दांकन : विद्याचंद्र सातपुते ■
सेवा निवृत्त प्राचार्य
(आय.टी. आय.अकोले)

मा.बाबासाहेब किसनराव वैद्य यांचा जन्म दि.१/६/१९६८ रोजी झाला.त्यांचे इयत्ता १ली ते ४थी पर्यंत चे प्राथमिक शिक्षण निमगाव पागा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, इयत्ता पाचवी न्यू इंग्लिश स्कूल निमगाव पागा येथे आत्याकडे झाले.

इयत्ता ६वी ते १० वी पर्यंत चे शिक्षण अगस्ति विद्यालय अकोले येथे झाले.इयत्ता ११वी ते बी ए पर्यंत चे शिक्षण अकोले महाविद्यालय येथे झाले. त्यानंतर त्यांना खेळाची आवड असल्याने त्यांनी शारीरिक शिक्षणात आपले करियर करण्याचे ठरविले व

सन १९९१-९२ मध्ये बी.पी. एड शिक्षण बीड येथील केशरबाई क्षीरसागर काकू शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे पूर्ण केले.

बीपीएड चे शिक्षण पूर्ण झाल्यावर ते दि १४/६/१९९२ ते दि.७/६/१९९७ या काळात कुंभेफळ येथील श्री शेष नारायण हायस्कूल मध्ये सहायक शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य सुरू केले.

दि.७/९/१९९७ ते दि. १३/६/२०१२ या काळात छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल मेहेंदुरी येथे सहायक शिक्षक काम केले.

दि १४/६/२०१२ ते दि.२८/२/२०२३या काळात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शेंडी येथे काम केले. देशाप्रती आपण काही देणे लागतो ही भावना जपत त्यांनी याच काळात RSP वाहतूक सुरक्षा दलात दि.२१/५/२०१७ पासून काम केले. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना संस्कार प्रतिष्ठान,महाराष्ट्र राज्य

यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय श्री स्वामी विवेकानंद संस्काररत्न पुरस्कार दि.१२/०१/२०१९ रोजी पुणे येथे देण्यात आला.

त्यांनतर क्रीडा क्षेत्रातील राज्यस्तरीय गुणवंत क्रीडा शिक्षक पुरस्कार

सावित्रीबाई चॅरिटेबल ट्रस्ट शीवडाव ता.भूदरगड,जि.कोल्हापूर यांच्या कडून दि.२५/३/२०२३ रोजी देण्यात आला.

त्यांनी कोरोना काळात कोरोना योद्धा म्हणून अतिशय उल्लेखनीय कामगिरी केली.

दि.१/३/२०२३/ ते ३१/५/२०२३ या काळात भारतरत्न राजीव गांधी माध्यमिक विद्यालय धामणगाव आवारी येथे मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने नियुक्ती झाली.

दि.१/६/२०२३ ते ३१/५/२०२६ या काळात सावित्राआई विद्यामंदिर विठे येथे मुख्याध्यापक म्हणून काम करताना त्याच ठिकाणी त्यांनी आपली सेवा पूर्ण केली.

त्यांचे क्रीडा क्षेत्रातील

एक उत्कृष्ट क्रीडा शिक्षक म्हणून उल्लेखनीय कामगिरी ठरलेली आहे.कुंभेफळ येथे असताना १९९५-९६मध्ये सोलापूर येथे विभागीय पातळीवर त्यांना खेळण्याची संधी मिळाली.

मेहेंदुरी येथे असताना सन २००१ते २००३अशी सलग तीन वर्षे राज्य पातळीवर त्यांची निवड झाली.

संस्था पातळीवर झालेल्या क्रीडा स्पर्धांमध्येही त्यांनी उल्लेखनीय यश मिळवले.

खेळाबरोबरच त्यांच्या मराठी विषयात विद्यार्थ्यांनी उज्वल यश मिळवले. त्यांच्या मराठी विषयात शेंडी येथे कार्यरत असताना २०२३ साली दिव्या दत्तात्रय आवारी सर्वाधिक ९६.६० गुण मिळवून केंद्रात पहिली तर सिद्धी विजय देठे ९६ गुण मिळवून द्वितीय आली.

यावर्षी विठे येथे असताना मुख्याध्यापक चार्ज असूनही त्यांच्या मराठी विषयात सोहम राधाकिसन आरोटे ९२ गुण, वैष्णवी हरिदास आरोटे व साई मदन भागवत ९१ गुण मिळवून उत्तीर्ण झालेले आहेत.मा.वैद्य सर हे अतिशय विद्यार्थी प्रिय शिक्षक असून त्यांनी आपले शैक्षणिक कार्य हे प्रामाणिकपणे,खिलाडू वृत्तीने, निष्ठेने व सक्षमपणे पार पाडले. अनेक गोर गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पसरवून त्यांच्या चेहऱ्यावर यशाचा आनंद फुलविला. त्यांनी संस्कारक्षम,चारित्र्यवान ,प्रामाणिक,पिढ्या घडविल्या. त्यांच्या कालावधी मध्ये अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्च पदस्थ म्हणून कार्यरत आहेत. संस्थेचे माजी सेक्रेटरी मा.यशवंतराव आभाळे हे त्यांचे मित्र असूनही त्यांनी नोकरीच्या काळात मित्रत्व बाजूला ठेवून आपले कर्तव्य पार पाडले. संस्थेचे माजी अध्यक्ष तथा विश्वस्त मा.दशरथराव सावंत साहेब,माजी सेक्रेटरी कै. मिनानाथ पांडे साहेब ,हमीदभाई फारुकी,लक्ष्मणराव शिंदे,विस्तारप्रमुख प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, रंगनाथ मामा मालुंजकर,भाउपाटील आंबरे यांचे सह संस्थेचे आजी माजी पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य यांचे सरांना नेहमीच सहकार्य लाभले. तर संस्थेचे कार्यकारी विश्वस्त माजी मंत्री लोकनेते वंदनीय पिचड साहेब यांचे विशेष प्रेम होते तर माजी आमदार वैभवराव पिचड साहेब यांचे सरांवर विशेष प्रेम आहे.कोणत्याही मोहाला बळी न पडता त्यांनी कधीही आपल्या कर्तव्याशी प्रतारणा केली नाही.

कधीही मित्राच्या पदाचा गैरफायदा घेतला नाही हे त्यांचे गुण वैशिष्ट्य ठरले.त्यांच्या काळात विठेच्या माध्यमिक विद्यालयाची सुंदर इमारत उभी राहिली. ग्रामस्थांना,संस्थेला बरोबर घेऊन त्यांनी शाळेसाठी काम केले.विद्यार्थ्यांप्रति त्यांची असलेली निष्ठा,आपुलकी,आणि पालकांच्या मनातील त्यांच्या विषयीचा दृढ विश्वास हाच त्यांच्या कार्याचा गौरव म्हणावा लागेल.

गरजेच्या वेळी धावून जाणे हा त्यांचा स्वभाव सर्वांना प्रेरणादायी ठरला आहे. असे आदर्श मुख्याध्यापक असलेले मा.बाबासाहेब किसनराव वैद्य यांना या सेवापूर्ती सोहळ्या निमित्ताने सेवापूर्तीच्या नंतरच्या आनंददायी जीवनासाठी, उत्तम आरोग्य व उदंड आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा...!

## थोडक्यात पण महत्वाचे



### महालक्ष्मी इंजिनिअरिंगला नगरसेवक महेश इंगळे यांची सदिच्छा भेट!

अक्कलकोट (स. गांवकरी) : अक्कलकोट श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी आपल्या नियोजित कोल्हापूर दौऱ्यादरम्यान शिरगाव एमआयडीसी येथील महालक्ष्मी इंजिनिअरिंगला सदिच्छा भेट दिली. यावेळी महालक्ष्मी इंजिनिअरिंगचे संस्थापक संदीप पाटील यांच्या वतीने महेश इंगळे यांचे वाजतगाजत स्वागत करून सत्कार करण्यात आला. भेटीदरम्यान शिरगाव एमआयडीसी परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनारूढ मूर्तीचे पूजन महेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित स्वामी भक्तांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष तसेच श्री स्वामी समर्थ नामस्मरण करून वातावरण भक्तिमय केले. यावेळी संदीप पाटील यांनी आपल्या जीवनप्रवासातील अनुभव कथन करताना नास्तिकतेकडून अध्यात्मिकतेकडे झालेल्या वाटचालीविषयी माहिती दिली. तसेच श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपेने मंदिर उभारणीचा दृष्टांत कसा मिळाला आणि विविध अडचणींवर मात करून कार्य कसे यशस्वी झाले, याविषयी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी महालक्ष्मी इंजिनिअरिंगचे कर्मचारी तसेच महेश इंगळे मित्र परिवारातील अनेक मान्यवर, स्वामी भक्त आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### बकरी ईद उत्साहात साजरी, सुख शांती, एकोपा व समृद्धीसाठी प्रार्थना

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर याठिकाणी बकरी ईद निमित्त मुस्लिम बांधवांनी येथील ईदगाह मैदान, सुन्नी जामा मस्जिद येथे सामुदायिक नमाज पठण करून एकमेकांची गळाभेट घेत समाजात सुख शांती, एकोपा व समृद्धीसाठी प्रार्थना करत बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. या निमित्ताने इदगाह मैदान येथे नमाज अदा करण्यात आली. यावेळी त्यांनी मुस्लिम बांधवांना एकतेचा आणि एकात्मतेचा संदेश दिला. अहंकार, एकमेकांचा द्वेष व वाईट सवयी यांचा त्याग करावा. शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करून ईद साजरी करावी. असे आवाहन या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी केले. यावेळी मौलाना यांनी बकरी ईदच्या सणामागील त्याग आणि बलिदानाचे महत्त्व स्पष्ट केले. इस्लाम धर्मातील पैगंबर हजरत इब्राहिम यांनी अल्लाहच्या आदेशानुसार त्यागाची भावना जपल्याची आठवण करून देत त्यांनी मुस्लिम बांधवांना समाजात एकता, शांतता आणि बंधुभाव कायम ठेवण्याचे आवाहन केले.

### दिव्यात रिक्षा चालकांची मनमानी ; जवळचे भाडे नाकारने सुरूच

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरात रिक्षा चालकांकडून जवळच्या अंतराचे भाडे नाकारण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेतहा दिवा स्टेशन ते सिद्धिविनायक गेट, बी. आर. नगर, ग्लोबल शाळा परिसर या ठिकाणी जाण्यासाठी प्रवाशांना रिक्षा मिळणे कठीण झाले आहे. अनेक रिक्षा चालक जवळच्या प्रवासाला नकार देत गणेशनगर, साईबाबा मंदिर, बेडेकर नगर, आगासन अशा लांब पल्ल्याच्या भाड्यांना प्राधान्य देत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. दिवेकर प्रवाश्यांच्या म्हणण्यानुसार जवळच्या अंतराचे भाडे कमी मिळत असल्याने रिक्षा चालक सर्रास प्रवाशांना नकार देतात. यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. एका ज्येष्ठ प्रवाशाने आपली व्यथा मांडताना सांगितले की, "अनेक वेळा रिक्षा थांबवूनही चालक जवळचे ठिकाण ऐकताच नकार देतात. काही वेळा तर उद्धट भाषेत उत्तर दिले जाते. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांची कोणतीही दखल घेतली जात नाही तर रिक्षा स्टँड सोडून इतरत्र रिक्षा उभ्या करतात." दरम्यान, संबंधित रिक्षा युनियनकडे तक्रार केल्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

## एमआरपीच्या नावाखाली होणाऱ्या ग्राहकांच्या आर्थिक शोषण विरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे २ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर शांततेत आंदोलन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

वस्तूच्या छापील किमतीच्या (MRP) नावाखाली सर्वच उत्पादित कंपन्यांकडून ग्राहकांचे आर्थिक शोषण होत असून ते थांबवण्यासाठी आणि बाजारपेठेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आज अखेर सविनय कायदे पालन करून आपले म्हणणे मांडणाऱ्या अखिल भारतीय ग्राहक पंचायत या स्वयंसेवी संघटनेने पुढाकार घेतला असून येत्या २ जून २०२६ रोजी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाधिकारी कार्यालय समोर शांततेत आंदोलन....' करण्यात येणार असल्याचे आयोजित पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. याप्रसंगी . जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी,प्रकाश रासकर शहराध्यक्ष, सिताराम बोरुडे जिल्हा सहसचिव, विनोद पेंटा शहर उपाध्यक्ष, हरिभाऊ चौधरी जिल्हा ग्राहक प्रबोधन प्रमुख, शहर सचिव अजय काथेड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ग्राहकांकडून वस्तूवर अवाजवी किंमत आकारली जाऊ नये म्हणून एमआरपी अर्थात (मॅक्झिमम रिटेल प्राइस) कमाल विक्री किंमत ही संकल्पना मानली गेली. परंतु आज प्रत्यक्षात हीच व्यवस्था अनेक ठिकाणी ग्राहकांच्या आर्थिक शोषणाचे व्यासपीठ बनली आहे. ही लूट थांबवण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने पुढाकार घेतला आहे १.प्रत्येक पाकिटावर वस्तूचे 'उत्पादन मूल्य' (Cost of Production) छापणे सक्तीचे करावे. २. प्रथम विक्री किंमत स्पष्टपणे नमूद करणे कायदेशीर करावे. ३. औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंवर नफ्याची मर्यादा (Profit Cap)सरकारने निश्चित करावी. ४.एम आर पी ठरवण्यासाठी वाजवी कमाल मर्यादा निश्चित करणारा स्वतंत्र कायदा करावा. ५.एम आर पी संदर्भातील गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करावे. या आंदोलनाचा प्रारंभ म्हणून दिनांक ११ मे २०२६ रोजी महाराष्ट्र प्रांतातील सर्व जिल्हास्तरीय पदाधिकारी कार्यकर्ते यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला ग्राहक पंचायत चे म्हणणे जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे सादर केले आहे. तसेच, महाराष्ट्रातील सर्व खासदारांना त्यांच्या मतदारसंघात भेटून या संदर्भात संसदेत आवाज उठवण्यासाठी निवेदन दिले गेले

"ही लढाई कोणत्याही व्यापारी अगर उत्पादक यांच्या विरोधात नसून ग्राहकांचे होणारे आर्थिक शोषण थांबवून व्यवस्था सुधारणारी चळवळ म्हणून या आंदोलनाकडे समाजातील सर्व घटकांनी पहावे व या लढ्यात सहभागी व्हावे असे आवाहन हि अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या वतीने करण्यात आले आहे. आज एमआरपी ही ग्राहक संरक्षणाची नव्हे तर ग्राहक शोषणाचे साधन बनत चालली आहे. सामान्य ग्राहकांना वस्तूची खरी किंमत समजत नाही, त्यामुळे तो फसला जातो. सरकारने तात्काळ ठोस कायदा करून ग्राहकांना न्याय द्यावा" अशी मागणी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून करण्यात येत आहे.

## नारायणगाव येथे बकरी ईद उत्साहात साजरी



नारायणगाव : (स. गांवकरी)

आज देशभरात ईद उल अजहा अर्थात बकरी ईद उत्साहात साजरी होत आहे. या ईदचा उत्साह नारायणगाव व परिसरातही पहायला मिळाला. नारायणगाव येथील ईदगाह मैदान, सुन्नी जामे मस्जिद परिसरात नमाज पठणासाठी मस्लिम बांधवांनी सकाळी गर्दी केली होती. नमाज पठणानंतर गळा भेट घेत बांधवांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सपोनि प्रवीण संपांगे म्हणाले की, बकरी ईद निमित कुरबानी करत असताना नागरिकांनी अहंकार आणि वाईट सवयी यांचा त्याग करावा तसेच शासनाच्या नियमांचे पालन करून ईद साजरी करावी असे आवाहन करत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सुन्नी मुस्लिम जमातचे अध्यक्ष एजाज आतार, विश्वस्त महेबुब काझी यांनी मुस्लिम बांधवांना प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करत सर्वांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच पोलीस बांधव आपले सुख दुःख विसरून समाजाच्या सुरक्षेसाठी सातत्याने काम करत आहे असे सांगितले. ग्रामपंचायत नारायणगाव उपसरपंच बाबू पाटे यांचेही मोलाचे सहकार्य असल्याचे सांगत त्यांचे आभार मानत सन्मान यावेळी करण्यात आला.

यानिमित्ताने इदगाह मैदान येथे मौलाना मोहंमद सज्जाद रजा तर सुन्नी जामा मस्जिद येथे हाफिज शेहबाज रजा यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करण्यात आली. यावेळी त्यांनी मुस्लिम बांधवांना एकतेचा आणि एकात्मतेचा संदेश दिला

यानिमित्ताने उपसरपंच बाबु पाटे, सुरज वाजगे, पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील, सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रवीण संपांगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमशेखर शेटे, पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील, गोपनीय विभागाचे दत्ता ढेंबरे यांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सुन्नी मुस्लिम जमात चे अध्यक्ष एजाज आतार, विश्वस्त महेबुब काझी, हाजी नुरमहमंद मनियार, गफूर तांबोळी, रशीद इनामदार, जलील अन्सारी, अलीसाबीर इनामदार, ग्रामपंचायत सदस्य जुबेर आतार, जुबेर शेख, रियाज मणियार, युवाशक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष अशफाक पटेल, यांसह सुन्नी मुस्लिम जमातचे पदाधिकारी व नमाज पठणासाठी आलेले मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नालेसफाईनंतर शाळेसह अनेक ठिकाणी कचऱ्याचा डोंगर

ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे महापालिका आयुक्त सौरव राव यांनी पावसाळा पूर्व नालेसफाई मोहीम मोठ्या गाजावाजात करत केली सुरू असली तरी प्रत्यक्षात दिवा परिसरात नालेसफाईनंतर काढण्यात आलेला गाळ आणि कचरा अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेलाच पडल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. विशेष म्हणजे काही शाळांसमोरच नाल्यातील दुर्गंधीयुक्त कचऱ्याचे ढिगारे पडून १५ दिवस झाले असून देखील पालिका प्रशासनाने न उचलल्याने विद्यार्थी, पालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिव्यातील विविध भागांमध्ये नाल्यांमधून काढलेला चिखल, प्लास्टिक, सडलेला कचरा आणि गाळ अनेक दिवसांपासून उचलण्यात आलेला नाही. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचे प्रमाणही वाढले आहे. शाळा प्रवेशासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या घाणीमधून मार्ग काढत जावे लागत असल्याने पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ठाणे महापालिकेकडून नालेसफाईचे काम फक्त दिखाव्यासाठी केले जात असून साफसफाईनंतर कचरा तत्काळ उचलला जात नाही. परिणामी पाऊस सुरू झाल्यानंतर हाच गाळ पुन्हा नाल्यात जाण्याची शक्यता असून पूरस्थिती निर्माण होऊ शकते, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी ठाणे महापालिकेच्या संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन रस्त्यावर पडून असलेला गाळ व कचरा उचलावा तसेच शाळांसमोरील परिसर स्वच्छ करून आरोग्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

## मोहनराव रोकडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

पारनेर : (स. गांवकरी)

जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते मोहनराव रोकडे यांचा वाढदिवस शासकीय विश्रामगृह येथे दीपक अण्णा लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास रवींद्र राजदेव, उपसरपंच किरण तराळ, संतोष खामकर, दत्ता निवडूंगे आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी मोहनराव रोकडे यांचे पक्षातील योगदान, सामाजिक कार्य आणि राजकीय वाटचालीचा सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन अभिनंदन केले. कार्यक्रमात मोहनराव रोकडे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आणि पक्ष मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करण्याचे आवाहन केले. दुसरीकडे, टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते रविंद्रशेठ राजदेव यांनी वडगाव सावताळ (गाजदिपूर) येथे ग्रामस्थांच्या उपस्थितीत मोहनराव रोकडे यांचा वाढदिवस साजरा केला. यावेळी ग्रामस्थांना साखर आणि विविध खाऊचे वाटप करण्यात आले. टाकळी ढोकेश्वर गटाचे प्रमुख नेते रविंद्रशेठ राजदेव यांनी मोहनराव रोकडे यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण भागात विशेष उपक्रम राबवला. वडगाव सावताळ (गाजदिपूर) येथे ग्रामस्थांसोबत साखर व खाऊ वाटप करून त्यांनी सामाजिक बांधिलकी दर्शवली. कार्यक्रमात शिक्षक नेते संतोष खामकर, उत्तमशेठ नऱ्हे, खंडू करगळ, नांदूर पठारचे सरपंच भानुदास आग्रे, भाऊसाहेब चौधरी, पत्रकार विनोद गायकवाड, श्रीनिवास शिंदे, गणेश जगदाळे, भाऊसाहेब सातकर पाटील, खंडू कोळेकर, गुलाब करगळ आदी मान्यवर उपस्थित होते.

महिला भगिनींची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. ग्रामस्थांनी रविंद्रशेठ राजदेव यांच्या या पहिल्या उपक्रमाचे स्वागत केले. त्यांनी सर्व ग्रामस्थांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि भविष्यात असे सामाजिक उपक्रम सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एकजूट आणि ग्रामीण विकासासाठी पक्ष नेत्यांचे प्रयत्न यावर चर्चा झाली. उपस्थित सर्वांनी मोहनराव रोकडे यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# श्री राजे युवा प्रतिष्ठान आयोजित विद्यार्थी गुणगौरव

## प्रतिष्ठानचे नरेश म्हाडसे यांचे आयोजन

ठाणे : (स. गांवकरी)

सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांमध्ये मुरबाड तालुक्यामध्ये काम करणाऱ्या श्री राजे छत्रपती युवा प्रतिष्ठान मुरबाड या संस्थेच्या वतीने नुकताच मुरबाड तालुक्यातील इयत्ता १० वी आणि १२ वी मध्ये उत्कृष्ट यश प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा माऊली गार्डन सभागृह येथे प्रतिष्ठानचे अध्यक्ष नरेश म्हाडसे यांच्या उत्कृष्ट संयोजनाने संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी दानशूर व्यक्तिमत्व नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख मधुकर आप्पा घुडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे सरचिटणीस विश्वासराव आरोटे, महिला परिवर्तन संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई ठाकरे,



शिवसेना उपजिल्हाप्रमुख कांतीलाल कंटे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुदाम पाटील, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष चेतनसिंह पवार, भाजपा मुरबाड तालुका अध्यक्ष जयवंत सूर्यराव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मुरबाड तालुका प्रमुख संतोष विशे , शहापूरकर बाई भारती आगिवले , शिवसेना शहर प्रमुख मुरबाड मंगेश भुसारी, भगवान म्हाडसे, जयवंत हरड, दत्ता पतंगराव, पद्माकर दळवी, आंबळे गावचे पोलीस पाटील पवार ,किसन विशे, पोलीस पाटील संतोष चौधरी, ज्येष्ठ शिवसैनिक बाळू पष्टे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुरबाड तालुक्यातील शेकडो यशस्वी विद्यार्थ्यांचा शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र ,घड्याळ पेन, मेडल देऊन सन्मान करण्यात आला . यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना मार्गदर्शन केले. एन के टी संस्थेच्या माध्यमातून मुरबाड तालुक्यातील विद्यार्थ्यांना भविष्यात जे काही सहकार्य लागेल ते करण्याचे अभिवचन यावेळी डॉ. नानजीभाई ठक्कर यांनी दिले. सरस्वती आली की लक्ष्मीला यावे लागते. विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे जास्त लक्ष द्यावे असेही त्यांनी सांगितले.




ठाणे : दिवा शहरात रिक्षा चालकांकडून जवळच्या अंतराचे भाडे नाकारण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेतहा दिवा स्टेशन ते सिद्धिविनायक गेट, बी. आर. नगर, ग्लोबल शाळा परिसर या ठिकाणी जाण्यासाठी प्रवाशांना रिक्षा मिळणे कठीण झाले आहे. अनेक रिक्षा चालक जवळच्या प्रवासाला नकार देत गणेशनगर, साईबाबा मंदिर, बेडेकर नगर, आगासन अशा लांब पल्ल्याच्या भाड्यांना प्राधान्य देत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## थोडक्यात बातम्या...



### श्रीगोंद्यात बकरी ईद उत्साहात साजरी

श्रीगोंदा (स. गांवकरी) : शहरासह तालुक्यात मुस्लिम समाज बांधवांनी गुरुवारी (दि. २८ मे) बकरी ईद (ईद-उल-अजहा) मोठ्या उत्साहात साजरी केली. शहरातील आनंदकर मळा येथील ईदगाह मैदानावर सकाळी ८.३० वाजता मौलाना जैनुद्दीन आत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. या नमाजसाठी शहरासह तालुक्यातील हजारो मुस्लिम बांधव अबालवृद्धांसह उपस्थित होते. महिलांची सामुदायिक नमाज सुफी संत शेख महंमद बाबा दर्गाह येथे पार पडली. नमाजपूर्वी धार्मिक व्याख्यान झाले. त्यानंतर खुदबा व सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. देशात शांतता, समृद्धी आणि राष्ट्रीय एकात्मता नांदावी, यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील विविध मशिदींमध्ये बकरी ईदची नमाज अदा करण्यात येत होती. प्रमुख नमाज ईदगाह मैदानावर पार पडली. ईदनिमित्त मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या भेटीगाठी घेत शुभेच्छांची देवाणघेवाण केली. तसेच कुर्बानी करताना इतर धर्मीयांना कोणताही त्रास होणार नाही आणि गोवंश जनावरांची कुर्बानी करण्यात येऊ नये, अशा विशेष सूचना समाजबांधवांना देण्यात आल्या. दरम्यान, पोलीस प्रशासनाच्या वतीने खबरदारीचा उपाय म्हणून पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ईदगाह मैदान, शहर तसेच तालुक्यात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नमाजनंतर सुफी संत शेख महंमद बाबा दर्गाह येथे दर्शनासाठी मुस्लिम बांधवांनी मोठी गर्दी केली होती. बकरी ईदनिमित्त सोशल मीडियावरही शुभेच्छांचा वर्षाव होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### श्रीगोंदा प्रशासन – शेतकरी – चळवळ यांचा यशस्वी समन्वय



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : शेतकरी, महसूल प्रशासन आणि शिव पाणंद शेतरस्ते चळवळ यांच्या संयुक्त प्रयत्नातून पारगाव–वडळी येथील शिवरस्त्याचे सीमांकन यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. गावातील शेतकऱ्यांनी सकारात्मक सहकार्य करत रस्ते मोकळे करण्यासाठी पुढाकार घेतल्याने अतिक्रमणमुक्तीच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. शेतरस्ता हा शेतकऱ्यांच्या विकासाचा महत्त्वाचा दुवा मानला जातो. रस्ते मोकळे झाल्यामुळे शेतात जाणे सुलभ होणार असून, पावसाळ्यातील वाहतुकीच्या अडचणी कमी होणार आहेत. तसेच शेतीमाल वेळेत बाजारात पोहोचविणे शक्य होणार आहे. रुग्णवाहिका, ट्रॅक्टर, हार्वेस्टर यांसारख्या वाहनांना सहज प्रवेश मिळणार असल्याने शेतकऱ्यांचे दैनंदिन कामकाज अधिक सोयीचे होणार आहे. या उपक्रमामुळे गावातील वाद कमी होऊन सामाजिक ऐक्य वाढण्यास मदत होणार असून, जमिनीची किंमत आणि शेती उत्पादनवाढीसही चालना मिळणार आहे. विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांच्या सुरक्षित प्रवासासाठीही हे सीमांकन महत्त्वाचे ठरणार आहे. “प्रशासन आणि शेतकरी एकत्र आले तर कोणताही रस्ता अशक्य नाही. पारगाव–वडळी गावाने आज राज्यासमोर आदर्श निर्माण केला आहे. असेच सहकार्य सर्व गावांनी केल्यास महाराष्ट्रातील हजारो शेतकऱ्यांना न्यायाचा रस्ता मिळेल,” असे मत शेत पाणंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी, “शिवरस्ता मोकळा... शेतकऱ्यांचा विकास पक्का!” हा संदेश देत शेतकऱ्यांच्या शेतरस्ते संघर्षात शेत पाणंद शिवरस्ते चळवळ सदैव पाठीशी राहील, असे आवाहन केले.

## महागाईच्या संकटात जनतेला दिलासा द्या

- पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट आणि सरचार्ज रद्द करा
- खासदार नीलेश लंके यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



देशभरात वाढत चाललेल्या महागाईच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांविरोधात खासदार नीलेश ज्ञानदेव लंके यांनी राज्य सरकारकडे आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र शासनाने पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट आणि सरचार्ज तात्काळ रद्द करावा, अशी मागणी खासदार लंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे. या निर्णयामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. खासदार लंके यांनी पत्रात म्हटले आहे की, आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला असून, त्याचा परिणाम थेट सर्वसामान्य जनतेवर होत आहे. खाद्यतेल, भाजीपाला, धान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यातच पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढून महागाई आणखी तीव्र होत आहे.

केंद्र सरकारकडून सातत्याने पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढवल्या जात असून, मागील दहा दिवसांत सलग चौथ्यांदा दरवाढ करण्यात आली आहे. पेट्रोलमध्ये २ रुपये ६१ पैसे, तर डिझेलमध्ये २ रुपये ७१ पैशांनी वाढ झाली असल्याचे खासदार लंके यांनी नमूद केले आहे. सध्या मुंबईमध्ये पेट्रोल १११.१२ रुपये प्रति लिटर, तर डिझेल ९६.८६ रुपये प्रति लिटर दराने उपलब्ध असल्याने सामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे, असे त्यांनी म्हटले आहे. राज्य सरकार पेट्रोलवर सुमारे २५ टक्के व्हॅट आणि १०.१२ रुपये प्रति लिटर सरचार्ज आकारत असल्याचे, तर डिझेलवर सुमारे २४ टक्के व्हॅट आणि ३ रुपये प्रति लिटर सरचार्ज आकारला जात असल्याचे लंके यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. हे कर आणि अधिभार रद्द करण्यात आल्यास पेट्रोल-डिझेलचे दर थेट ७० ते ८० रुपयांपर्यंत खाली येऊ शकतात, असा दावा त्यांनी केला आहे. महागाईमुळे शेतकरी, कामगार, छोटे व्यावसायिक, वाहनधारक आणि मध्यमवर्गीय कुटुंबे मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकारने संवेदनशीलता दाखवत नागरिकांना तातडीने दिलासा देण्याची आवश्यकता असल्याचे खासदार लंके यांनी म्हटले आहे. राज्य सरकारने पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट आणि सरचार्ज रद्द करून सामान्य जनतेच्या हिताचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंती खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.

## मंदिरात भागवत कथेचे आयोजन



आळंदी : (स. गांवकरी)

पुणे आळंदी रस्त्यावरील वडमुखवाडी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्ट चे वतीने ह.भ.प. आदिनाथ महाराज फपाळ यांच्या सुश्राव्य मंत्रमुग्ध करणाऱ्या वाणीतील श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन रविवार ३१ मे ते ७ जून २०२६ या कालावधीत हरिनाम गजरात होणार आहे. अशी माहिती श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष ॲड विष्णू तापकीर यांनी दिली आहे. पुरुषोत्तम मास हा नाम चिंतन, श्रवण, भजन, कीर्तन या साठी पर्वणी आहे. यात मंदिरात काकडा, हरिपाठ, महिला भजने, हरी जागर असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. दुपारी दोन ते पाच या वेळेत श्रीमद् भागवत कथा आदिनाथ महाराज फपाळ यांची श्रवणीय कथा होणार आहे. भाविक, नागरिकांनी या धार्मिक पर्वणीत उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. तापकीर यांनी केले आहे.

## सरकारी मेडिकल कॉलेज कापूरवाडी येथे होणार

(स. गांवकरी)

- २५ एकर जागा निश्चित
- खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

जिल्ह्याच्या वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालया’साठी नगर तालुक्यातील कापूरवाडी येथे २५ एकर जागा निश्चित करण्यात आली असून, जिल्ह्याच्या पहिल्या सरकारी मेडिकल कॉलेजचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असून महाविद्यालयासाठी ४४८ पदांची निर्मितीही मंजूर केली आहे. जिल्ह्यात सरकारी मेडिकल कॉलेज व्हावे, यासाठी खासदार डॉ. निलेश लंके गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत होते. दिल्ली ते मुंबई विविध स्तरांवर बैठका घेऊन त्यांनी जिल्ह्याची आवश्यकता शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांच्यासमोरही त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्याची परिस्थिती मांडत मेडिकल कॉलेजची गरज अधोरेखित केली होती. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर राज्य शासनाने प्रकल्पाला गती देत आवश्यक प्रशासकीय निर्णय घेतले आहेत. महाविद्यालयासाठी सुरुवातीला नालेगाव, अरणगाव आणि कापूरवाडी या ठिकाणांची पाहणी करण्यात आली होती. त्यानंतर सर्व निकषांचा विचार करून कापूरवाडी येथील २५ एकर जागा अंतिम करण्यात आली आहे.

या ठिकाणी भविष्यात अत्याधुनिक सुविधा असलेले मेडिकल कॉलेज, संलग्न रुग्णालय, विद्यार्थी वसतिगृह आणि संशोधन सुविधा उभारल्या जाणार आहेत. चालू शैक्षणिक वर्षापासून १०० एमबीबीएस जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असून सप्टेंबर २०२६ पासून प्रत्यक्ष अध्यापन सुरू होण्याची शक्यता आहे. नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत महाविद्यालयाचे तात्पुरते कामकाज जिल्हा आयुष रुग्णालयातून चालविण्यात येणार आहे.


## अखेर सिडको हडको परिसरातील मुख्य मार्गावरील स्ट्रीट लाईट म प्रभाग क्रमांक 20 चा नगरसेवक यांच्या सततचा पाठपुराव्यामुळे चालू

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

सिडको हडको परिसरातील मुख्य मार्गावर गेल्या अनेक वर्षांपासून अंधाराच्या साम्राज्यात असलेल्या परिसराने अखेर मोकळा श्वास घेतला असुन या भागातील मुख्य रस्त्यांवरील बंद असलेले पथदिवे (स्ट्रीट लाईट्स) अखेर सुरू झाले असून, यामुळे संपूर्ण परिसर प्रकाशाने उजळून निघाला आहे. अनेक वर्षांची ही समस्या मार्गी लागल्यामुळे विविध प्रतिष्ठानचे व्यापारी ,नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असून, मनपा प्रशासन आणि प्रभाग क्रमांक 20 मधील नगरसेवक यांनी पुढाकार घेऊन स्ट्रीट लाईट चालू केल्याने समाधान व्यक्त केले आहे.

सिडको हडको परिसराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी या भागातील भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, मंगला गजानन २

देशमुख, सौ.निरंजना राजू लांडगे आणि सौ.सुवर्णा सतीश बसवदे यांनी दाखविलेल्या एकजुटीमुळेच हा प्रलंबित असलेला स्ट्रीट लाईट प्रश्न सतत केलेल्या



पाठपुराव्यामुळे निकाली निघाला आहे. सिडको-हडको परिसरातील मुख्य रस्त्यांवर रात्रीच्या वेळी अंधार असल्याने वाहन धारकांना आणि पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता,सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला होता. मात्र, पाचही लोकप्रतिनिधींनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे महानगरपालिकेने या रस्त्यांवर नवे आणि पथदिवे कार्यान्वित केले आहेत. रात्रीच्या वेळी रस्ते उजळून निघाल्याने या भागाचे रूपच बदलून गेले आहे.


केवळ पथदिवेच नव्हे, तर या पाचही नगरसेवकांच्या एकत्र येण्यामुळे सिडको हडको परिसरातील इतरही अनेक रखडलेली विकासकामे आता जलद गतीने मार्गी लागणार असल्याचे चित्र आहे. पाणी, रस्ते, आणि सांडपाण्याची व्यवस्था यांसारख्या मोठ्या प्रकल्पांवरही या लोकप्रतिनिधींनी लक्ष केंद्रित केले आहे.अनेक वर्षांपासून या रस्त्यांवर रात्रीच्या वेळी प्रवास करताना भीती वाटायची, नगरसेवकांच्या एकजुटीमुळे आणि मनपाच्या तत्परतेमुळे आता रस्ते उजळले आहेत. डॉ . बाबासाहेब आंबेडकर चौक ते संभाजी चौक,राज चौक, क्रांती चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अण्णाभाऊ साठे पुतळा मार्ग, ज्ञानेश्वर मार्ग, डॉ.ढगे, गोविंद गार्डन या मुख्य मार्गावर हे स्ट्रीट लाईट चालू झाल्याने लोकप्रतिनिधींचे केलेले काम कौतुकास्पद असल्याचे बोलल्या जात आहे,या पाच नगरसेवकांच्या व सदस्य प्रतिनिधी उदय देशमुख,सतिश बसवदे,राजु लांडगे यांनी घेतलेल्या विकासान्मुख भूमिकेमुळे सिडको हडको परिसरात समाधान व्यक्त होत आहे. आगामी काळात या भागाचा कायापालट होणार असा विश्वास नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे.

## श्री विठ्ठल भक्ती रस महोत्सवाची देवगड येथे काल्याची दहीहंडी फोडून सांगता, लाखो भाविकांची उपस्थिती

### साधूंचे जीवन हे जगाच्या कल्याणासाठी व धर्म व राष्ट्राच्या हितासाठीच समर्पित-स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा तालुक्यातील गुरूदेव दत्त पीठ श्री क्षेत्र देवगड येथे राष्ट्रसंत गुरुवर्य महंत श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने पुरुषोत्तम मासाचे औचित्य साधून आयोजित श्री विठ्ठल भक्ती रस महोत्सव व श्रीमद भागवत कथा सोहळयाची गुरुवारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने काल्याची दहीहंडी फोडून भक्तिमय वातावरणात व लाखो भाविकांच्या उपस्थितीत सांगता करण्यात आली.जगाच्या कल्याणासाठी,समाजाच्या उद्धारासाठी साधूंचे जीवन हे धर्म व राष्ट्राकरता समर्पित असे असते असे प्रतिपादन





स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलतांना केले. देवगड येथील ज्ञानसागर सभामंडपामध्ये गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या काल्याच्या कीर्तनात बोलतांना देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज म्हणाले की साधू महात्मे व संतांच्या तपश्चर्येने व त्यांनी दिलेल्या शिकवणीमुळे आज आपली भारतीय संस्कृती ही जगात श्रेष्ठ व आदर्श बनली आहे,साधुसंतांच्या आशीर्वादाने या भूमीत कनाकणात देवता सामावली आहे. आज देवगड भूमी देखील श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या तपश्चर्येने पावन पवित्र झाली आहे,स्वर्गासारखे वाटणारी देवगडची निर्मिती त्यांनी केली असून गुरुवर्य महंत श्री भास्करगिरीजी महाराज यांनी अधिक मासाच्या निमित्ताने सर्व जीवाचे कल्याण झाले पाहिजे म्हणून श्रीमद भागवत कथेचे आयोजन त्यांनी याठिकाणी केले. या पर्वकाळात आपल्या भक्तांसाठी पुण्य कर्माची नोंदच त्यांनी केली असल्याचे त्यांनी यावेळी बोलतांना सांगितले. गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांनी तब्बल १४ वर्षांनी येथे श्रीमद भागवताची कथा केली,वारकरी संप्रदायाचे महत्व कळल्याने त्यांनी उत्तरेतून महाराष्ट्रात येऊन " विठ्ठल माझा माझा...माझा माझा माझा,विठ्ठल माझा मी विठ्ठलाचा या भक्ती गीताद्वारे सर्व वारकऱ्यांना वेड लावले.राधा हे भक्तीचे तर कृष्ण हे ज्ञानाचे प्रतीक असल्याचा संदेश त्यांनी कथेद्वारे दिला म्हणून जन्मोजन्मीच्या पुण्याईची नोंद कथेसारख्या भक्तीरुप अनुष्ठानामुळे आपल्याला प्राप्त झाली,निष्काम वृत्तीने आपण या पर्वकाळात कथा श्रवण केली त्यामुळे पुण्याचा ठेवा ही आपल्याला प्राप्त झाला असल्याचे त्यांनी सांगितले. झालेल्या श्रीमद भागवत कथेमध्ये दररोज आपल्या सुश्राव्य वाणीतून परमपूज्यनिय श्री राधाकृष्ण स्वामीजींनी उपस्थित हजारो भाविकांना मंत्रमुग्ध केले हा सोहळा यशस्वी होण्याआठी सर्व सेवेकऱ्यांनी नेमून दिलेली कामे सर्वांनी तनमन धनाने व निष्ठेने पार पाडली त्याबद्दल स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी देवगड संस्थानच्या वतीने सर्वांना धन्यवाद देत प्रत्येक सेवेकऱ्यांचे आभार मानले झालेल्या काल्याच्या कीर्तनात स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन करून गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांनी गायलेली ...विठ्ठल माझा माझा,"'डगमग डोळे माझे पाण्यावरी नाव ग,"ही भक्ती गीते पुन्हा गाऊन उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते देवगड महाद्वारावर लावण्यात आलेली दहीहंडी फोडून श्री विठ्ठल भक्ती रस महोत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी सावखेडा येथील गिरी आश्रमाचे महंत श्री कैलासगिरीजी महाराज,त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरी महाराज,नारायण महाराज ससे,दिनकरजी महाराज मते,आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,संत तुकाराम महाराज संस्थानचे महंत अंकुश महाराज जगताप, गायनाचार्य लक्ष्मण महाराज नांगरे, गणपत महाराज आहेर,नामदेव महाराज कंधारकर, रामनाथ महाराज पवार,विजय महाराज पवार,बाळू महाराज कानडे,बाबासाहेब महाराज सातपुते,गिरीजीनाथ महाराज जाधव,अमोल महाराज बोडके,गणेश महाराज तनपुरे,शशिकांत महाराज कोरेकर,रोहित महाराज पटारे, दादा महाराज साबळे, संतसेवक गायनाचार्य रामजी विधाते,बजरंग विधाते यांच्यासह वारकरी संप्रदायातील सर्व संत मंडळीसह हजारो भाविक यावेळी ज्ञानसागर सभामंडप मध्ये झालेल्या काल्याच्या कीर्तनाला उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)